# सायबर सुरक्षेबाबत जनजागृती



विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशाळांमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली.

संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हिल फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करारान्वये सायबर सुरक्षेबाबत सातत्याने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येतात. सध्या सायबर क्राईमच्या घटना वाढल्या आहेत. ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे घडत आहेत. या सगळ्याबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून कोणती खबरदारी घेतली पाहिजे. याबाबत माहिती देण्यात आली. प्रशाळेचे संचालक डॉ. सतिश कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेन्द्र कापसे, प्रा. मनोज पाटील, ठकन जानगवळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी आशिष पाटील, राजश्री कापुरे, पायस सावळे, पोर्णिमा चोधरी, कुणीका खेरनार, दर्शना हिंरे, वैष्णवी सांळुके, नेहा पवार, लिना भोंडे, संजना अंदुरकर, गौरव चोधरी, गजानन घुले यांनी विविध प्रशाळांमध्ये जावून सायबर सुरक्षेततेबाबत माहिती दिली.



## पी.एम.मुंदडे माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळा व क्विक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एम. मुंदडे माध्यमिक विद्यालय, जळगाव येथील ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षे संदर्भात माहिती देतांना संगणक प्रशाळेतील विद्यार्थी सचिन पाटील व मयूर बंडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. यावेळी जळगाव येथील सायबर क्राईम विभागातील पोलिस कर्मचारी अरविंद वानखडे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक कुमावत सर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.